# जागतिकिकरण व भारतीय स्त्रीयांसमोरील आव्हाने

**प्रा.डॉ. सुनिल माधवराव सिसोदे**

*(समाजशास्त्र विभाग प्रमुख)*

*कै.म.दि.सिसोदे कला, वाणिज्य व डॉ.उषाताई तनपुरे विज्ञान महाविद्यालय, नरडाणा ता.शिंदखेडा जि.धुळे*

***सारांश :-***

*जागतिकिकरण ही  अशी प्रतिक्रिया आहे की, जी मानवी संशाधने सुचना प्रसारण व तांत्रिक गोष्टीचा खुल्याप्रमाणे दळणवळण करते जागतिकिकरण म्हणजे विदेशी गुंतवणुक व जास्तीत जास्त विदेशी गुंतवणूकीचा व्यापारावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास होय. आज भारतात नाही तर संपुर्ण जगामध्ये उदारीकरण व जागतिकिकरणच्या नावावर एक पैशाच्या संदर्भात आर्थिक व्यवहार चालु आहेत. साम्राज्यवादी व गुंतवणुकदार हे जगाची अर्थव्यवस्था चालवत आहे जागतिकरण म्हणजे संपुर्ण जगाला व्यापारीक दुष्ट्या एकत्र आणुन एक चक्र बनविणे होय. एवढेच नाहीतर जागतिकिकरणामुळे आर्थिक गोष्टीबरोबरच सांस्कृतिक राजनितिक व शैक्षणिक संबंध एकत्रित आणण्यावरही भर देतो. जागतिकिकरण म्हणजे दुरच्या गोष्टी जवळ आणणे व त्यांना जवळ आणण्याची प्रक्रिया म्हणजेच जागतिकिकरण होय.*

जागतिकिकरण जवळपास 90 च्या दशकांमध्ये संपुर्ण जगावर त्याची छाया पडली या प्रक्रियेमध्ये संपुर्ण जगातील जागतिक मुद्यांना एक कुटुंबाच्या नजरेने बघतिले जाते जगामध्ये अशा प्रकारच्या आलेल्या समस्यांचा जागतिक अशा प्रकारच्या स्तरावरती त्यांना समजुन घेऊन त्यांचा समाधान करण्याचा प्रयत्न केला जातो. या संदर्भात डेव्डिल्ड हेल्ड या विद्ववानाचे मत जाणुन घेता येईल त्याच्या मते, जागतिकिकरणाने समकालिन सामाजिक उद्दिष्ट्यांना एकमेकाजवळ आणुन उभे करून दिलेले आहे. तिथे लोकांमध्ये सामाजिक आणि आर्थिक व्यवहार हे एकमेकांवर अवलंबुन आहे. जागतिकिकरण शब्दाची उत्पत्ती Globalization या इग्रंजी शब्दापासुन Globe म्हणजे गोल किंवा पृथ्वी असा आहे. संपुर्ण जगाला समाविष्ट करणारी क्रिया म्हणजेच जागतिकिकरण / Globalization असा आहे. जागतिकिकरण हा शब्द, संस्कृत भाषेतून आलेला आहे. जागतिकिकरणाचे वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये काय परिणाम झालेला आहे याचा वेगवेगळ्या देशांमध्ये काय परिणाम झालेला आहे याचा विचार करावा लागेल.जागतिकिकरण किंवा वैश्वीकरण हा शब्द 1990 नंतर विशेषतः व्यापार व विपणन या क्षेत्रांशी जुळलेला आहे या दोन गोष्टीचा विशेषतः आंतरराष्ट्रीय क्रियांवर / संबंधावर परिणाम म्हणजेच जागतिकिकरण होय. संपुर्ण जगातील बाजारपेठेला एक क्षेत्र म्हणुन बघणे दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे म्हटले म्हणजे प्रत्येक देशांच्या आपल्याकडे असणाऱ्या वस्तु, सेवा, धन / वित्त किंवा बौध्दीक संपदा यांची देवाण-घेवाण करणे म्हणजेच जागतिकिकरण होय. या सर्व गोष्टींचा परिणाम भारतीय स्त्रीयावरही दिसुन येत आहे. आजच्या युगामध्ये भारतीय स्त्रीया पुरुषाबरोबर किंवा पुरुषापेक्षाही एक पाऊल पुढे जागतिकिकरणाच्या स्पर्धेमध्ये म्हणजेच वस्तु, सेवा व बौध्दिक संपदेमध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतांना दिसतात भारतीय स्त्रीयांचा अभ्यास करत असतांना आपल्याला असे लक्षात येईल की, भारतीय स्त्रीचे स्थान नेमके भारतीय समाजांमध्ये कुठे आहे. या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण होतात. "वसुदैव कुटुंबकम" म्हणजेच हे विश्वची माझे घर हे ज्ञानेश्वरानी सांगितलेल्या श्लोकामध्ये जागतिकिकरण विश्व बंधुत्व डॉ. राममनोहर लोहिया यांनी विश्व नागरिकता हा शब्द आंतरराष्ट्रीय राजनितिक अनिवार्यता या संदर्भात वापरलेला आहे. सामाजिक आणि राजनितीक विचारांची पार्श्वभूमी आपण जर बधितली तर 20 व्या शतकांमध्ये विज्ञानाने स्त्रीयांच्या विरोधात एक नवीन योजना आखण्याचा उद्देश दिसुन येतो. ज्याचा परिणाम म्हणजे 1970 मध्ये मुंबई येथील हरिकिशन दास रुग्णालय मध्ये पहिले भ्रुण परिक्षण केले गेलेत त्यानंतर 1978 ते 1991 या कालखंडात त्याच रुग्णालयात 8 हजार पेक्षा जास्त भ्रुणपरिक्षण केले गेले. या संदर्भात बीबीसीने एक वृत्रचित्र (डाक्युमेटरी) बनविली. याला 'Born to Dia' असे नाव देण्यात आले.

श्रीमंत स्त्रीया फक्त मुलीचे पालन पोषण करू शकतात अशा प्रकारचा समज येथुन सुरु झाला मुलींना जन्म देणे म्हणजेच समाजामध्ये अपमान सहन करणे असा होतो जेव्हा जगामध्ये असा समज पसरत होता तेव्हा

भारतासारख्या पुरुषप्रधान असणाऱ्या देशांमध्ये याचा विलक्षण परिणाम दिसुन आला याचा परिणिती म्हणून 1981 ते 1991 या कालावधीमध्ये भारतामध्ये पुरुषापेक्षा स्त्रीयांचे प्रमाण 4.5 करोड ने कमी झालेले आहे.

राजीव गांधीचे या संदर्भात 1981 ला क्लोनिंग संदर्भात चेतावणी संदर्भातला उल्लेख आणास देता येईल 28 फेब्रुवारी 1997 ला एका ब्रिटीश वैज्ञानिकाने मेंढ्याचा क्लोन बनवला त्यानंतर काही दिवसांनी अमेरिकन शास्त्रज्ञ / वैज्ञानिक डॉन बुल्म याने एका माकडांवरती क्लोन करुन या प्रयोगाला मनुष्याचा अगदी जवळ आणुन ठेवले.

विज्ञान, वैज्ञानिक, समाज, अर्थशाळ, आर्थिक जग, राजनितिक आणि राजनितितज्ञ व वैज्ञानिक स्त्रीयांच्या विरोधान विचार करत असतांना स्त्रीयांच्या परिवेशामध्ये स्त्रीयांना आपल्याच स्थानांची शोध घेण्याची आवश्यकता होती यासर्व संकटामध्ये स्त्रीयांचे स्थान व मनोबल तुटत असतांना या सर्व जखमा सहन करत असतांना स्त्री एक करुणाचा विषय होत गेली. सीमोन दबाउवार या लेखिकेने पुरुष प्रधान समाजाच्या या कृतीवर लिहिते की पुरुष आपल्या सत्ता बनून ठेवण्यासाठी स्त्रीयांना आपल्या जन्मापासुनच अनेक नियमांचा प्रथेमध्ये टाकत आलेले आहे. या सिध्दांताच्या आधारावर आपल्याला भारतांमध्ये तीन मुख्य बिंदुवर विश्लेषण करता येईल.

संपुर्ण जग स्त्रीयांविषयी 125 वर्षापासून म्हणजेच सीमोन दबाउवारचे पुस्तक 'द सेंकद सेक्स' प्रकाशित झाल्यापासुन त्या पूर्वीच्या मानवाधिकारची चर्चा करत असतांना स्त्रीयांच्या संदर्भात ज्या काही घोषणा केल्या गेल्या त्या आजही जशाच्या तशा आहेत पुरुषप्रधान समाज हा स्त्रीयांच्या अधिकार संदर्भामध्ये एक चर्चा करत राहिले. मानव विकासाच्या अहवालानुसार 1985 मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमामध्ये पहिल्यांदा स्त्रीयांच्या विकासाच्या परिणांमाना समाविष्ट करण्यात आले. याच्यापुर्वी हे सगळे परिणाम अर्थहिन वाटत होते. स्त्रीयांनी फक्त पतीबरोबर समर्थन करणे एवढेच काम होते हाच समाज स्त्रीयांना सहासी, आक्रमक आत्मनिर्भर महत्वाकांक्षी होण्याची लक्षणे बघतो. सैध्दांतिक दृष्टीने या ठिकाणी विज्ञान व तंत्रज्ञान या दोघांनी स्त्रीयांची प्रतिमा सकारात्मक दिशेने परिवर्तन करण्याच्या प्रयत्न दिसुन येतो. जागतिकिकरणामध्ये उदारीकरण हा केंद्रबिंदु आहे. आणि या उदारिकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये स्त्रीयांना रोजगार संबंधित स्थान देण्याचा प्रयत्न दिसुन येतो. बहुराष्ट्रीय कंपन्या आपलं उत्पादन विकण्यासाठी स्त्रीयांच्या चमकदार शैलीचा फायदा घेत नाही तर त्यांना फसविण्याचा ही प्रयत्न दिसुन येतो. उदारिकरणामध्ये स्त्रीला स्वतंत्रता देणे एक फॅशन आहे त्याच्या संदर्भात स्त्रीचा उपभोग व शील पर्यंत जातो आजच्या स्त्रीशोषण संदर्भामध्ये निश्चितच विश्वविद्यालयीन संशोधनामध्ये अभ्यास केला गेला पाहिजे त्यांना गृहउद्योगांमध्ये स्थान देवुन जसे लहान लहान गृहउद्योग निर्माण करून स्त्रीयांना रोजगार मिळवुन देवुन त्यांना या जागतिकिकरणाच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले जावु शकते.

आधुनिक परंपरांना सोडून नवीन अशा प्रकारचे संशोधन करुन स्त्रीयांना त्या आधुनिक जगामध्ये स्त्रीयांना रोजगार निर्माण करून आर्थिक निर्भर करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :-**


- *कुरुक्षेत्र पत्रिका, नई दिल्ली, सितम्बर 2004 पुष्ठ 37.*
- *गांधी राजन – "अपनी कलम लगाइये और अमर हो जाइये" धर्मयुग 13 दिसम्बर 1981 पेज 17.*
- *इंटरनेट, गुगल – डॉ. चन्द्रशेखरन बालकृष्णनन यांचा लेख 2015.*
- *शर्मा श्रीनाथ : साहित्य और उत्तर आधुनिकता : आचरण (दैनिक सागर / ग्वालियर 1996).*
- *अरोडा एन.डी. – राजनीती विज्ञान सिविल सेवा मुल्य परीक्षा ताजा एम.सी.ग्रग्रो-हिल एज्युकेशन प्राइवेट लिमिटेड, नई दिल्ली (2011), पृ 30.*
- *बागची, कथकली एवं मिनि फिलिप : "स्त्रियॉं लूस क्या हो रही है" राजकिशोर द्वारा संपादित पुस्तक, स्त्री के लिए जगह, वाणी प्रकाशन नई दिल्ली 1994 पेज 109.*
- *Dale Peter & Others : "Dangerous Families" Tailstock Publication London 1985.*